2856

२६ वे **मराठवाडा साहित्य संमेलन**, माजलगाव : ४, ५ डिसेंबर २००४

## अध्यक्ष

# न्या. नरेन्द्र चपळगावकर

## यांचे भाषण



२६ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे उद्घाटक माझे बंधुतुल्य स्नेही रामभाऊ शेवाळकर, स्वागताध्यक्ष दिगंबररावजी देशमुख आणि त्यांचे सहकारी, आवर्जून उपस्थित असलेले मराठवाडा साहित्य संमेलनाचे सर्व भूतपूर्व अध्यक्ष, विशेष अतिथी आणि बंधू- भगिनीनो!

या सन्मानपदाला नम्रतापूर्वक स्पर्श करीत असताना हे पद भूषविलेल्या अनेक थोर साहित्यसेवकाप्रमाणेच किंबहुना त्यापेक्षाही अधिक स्मरण आज होत आहे ते ज्यांनी हे पद भूषविले असते तर या पदाचा सन्मान अधिक वाढला असता अशा दोन दिवंगतांचे. ध्येयवादी पत्रकार, स्वातंत्र्य लढ्याचे भाष्यकार आणि ज्यांच्या शब्दकळेत मराठवाड्याची सर्व सांस्कृतिक वैशिष्ट्ये प्रकट होत होती असे शैलीकार लेखक म्हणून आपण अनंत भालेराव यांना ओळखतो. व्यासंगी अभ्यासक, परखड समीक्षक आणि प्रभावी वक्ते म्हणून नरहर कुरुंदकर यांचीही आपल्याला ओळख आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठवाडा साहित्य परिषद ज्यांनी आपल्या निरलस कार्याने वाढविली त्यात अनंत भालेरावांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. परिषदेच्या संवर्धनाच्या या कामात नरहर कुरुंदकरांचेही योगदान महत्त्वाचे आहे. आपल्या स्वभावभूत विनयामुळे अनंतराव आणि अकाली निधनामुळे कुरुंदकर या पदासाठी आपल्याला लाभले नाहीत.

## स्वातंत्र्याची चळवळ आणि साहित्याची चळवळ

मराठवाडा साहित्य संमेलनांचे पावशतक पूर्ण करून आपण आज २६ व्या संमेलनाला प्रारंभ करीत आहोत. पहिले संमेलन झाले त्याला आज

सदुसष्ट वर्षे झाली. हैदराबाद संस्थानात १९३७ साली राजकीय प्रश्नांची चर्चा करणारी कार्यकर्त्यांची पहिली परिषद भरली त्याच वर्षी पहिले निजामप्रांतीय मराठी साहित्य संमेलनही भरले हा केवळ योगायोगाचा भाग नव्हता. जूनच्या सुरवातीला परतूडला महाराष्ट्र परिषदेसाठी जमलेले राजकीय चळवळ सुरू करू इच्छिणारे कार्यकर्ते व ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभी हैदराबादेत पहिल्या साहित्य संमेलनासाठी जमलेले कार्यकर्ते यांच्या मनातले सूत्र एकच होते. दोघांनाही पारतंत्र्यातून मुक्तता हवी होती. महाराष्ट्राच्या बाकीच्या भागातील पारतंत्र्यापेक्षा हैदराबाद संस्थानातील मराठी भाषिकांचे पारतंत्र्य अधिक गडद होते. राजकीय पारतंत्र्याबरोबरच येथल्या जनतेला भाषिक आणि सांस्कृतिक पारतंत्र्यही भोगावे लागत होते. प्राथमिक शिक्षण वगळले तर शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. राज्यकारभार त्याच भाषेत चालत होता. अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा होत्या. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमावरही सरकारी बंधने होती. मराठवाड्याचे सांस्कृतिक जीवन घुसमटलेले होते. म्हणूनच येथील स्वातंत्र्याची चळवळ ही मराठी भाषेचीही चळवळ असणार होती. भाषिक आणि वाङ्मयीन चळवळीलाही राजकीय स्वातंत्र्याची निकड भासत होती. स्वातंत्र्याची चळवळ सुरू करण्यासाठी स्थापन झालेली महाराष्ट्र परिषद आणि मराठी भाषा आणि साहित्य यांची चळवळ सुरू करण्यासाठी स्थापन झालेली मराठवाडा साहित्य परिषद या दोन्हींच्या अधिवेशनात राज्यकारभार मराठीतून चालावा आणि शिक्षणाचे माध्यम मराठी असावे असे ठराव संमत होत होते. त्यापूर्वीपासूनच मराठीचा अभिमान व्यक्त करणारी आणि तिच्या मुक्ततेसाठी संघर्षाची प्रेरणा देणारी मराठी गीते कांत - नांदापूरकर लिहीत होते. १९३७ च्या सुमाराला संस्थानातील सरकारी शिक्षण संस्थातून वंदे मातरम् हे गीत प्रार्थना म्हणून म्हणण्यास बंदी करण्यात आली. या बंदीच्या विरुद्ध विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. त्याचे पडसाद आमच्या साहित्यातही उमटले.

*'गा, गा, निर्भय गान,*
*सख्यांनो, गा, गा, निर्भय गान*
*स्वातंत्र्याच्या मंत्रोच्चारी भरू द्या नभोवितान'*

असे कविवर्य कांतांनी लिहिले. 'या गाण्याला कोण थांबविल' असा प्रश्नही त्यांनी विचारला.

निजाम प्रांतीय मराठी साहित्य संमेलन या नावाने आपण ही संमेलने भरविण्यास प्रारंभ केला, त्यावेळी संमेलनाला होणाऱ्या सरकारी आणि सरकारपुरस्कृत अडथळ्यांना तोंड द्यावे लागत होते. पारतंत्र्याच्या काळात आपण केवळ तीनच संमेलने भरवू शकलो. त्यानंतर अशी सरकारी बंधने राहिली नाहीत. आपण बंधमुक्त झालो तशीच आपली भाषाही बंधमुक्त झाली.

## लादलेल्या भाषिक पारतंत्र्यातही मनातले मराठी कायम

निजामाच्या राजवटीतही आमच्या जीवनातले सगळेच मराठी वर्ज्य झालेले नव्हते. कोणतेही सरकार एखाद्या लोकभाषेच्या वापराला जी बंधने घालते ती शिक्षण आणि राज्यकारभार या दोन क्षेत्रांत प्रामुख्याने असतात. लोकभाषेत शिक्षण मिळत नाही, तिला अभ्यासक्रमात प्राधान्य दिले जात नाही आणि राज्यकारभार लोकभाषेतून होत नाही. ज्यांना माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घ्यायचे आहे किंवा शासनाच्या एखाद्या कार्यालयाशी संबंधित काही काम आहे त्यांना राज्याने लादलेल्या दुसऱ्या भाषेचा आश्रय घेणे भाग पडते. हैदराबाद संस्थानातील मराठी, तेलगू आणि कन्नड भाषक जनतेलाही माध्यमिक शिक्षणासाठी मातृभाषेऐवजी राजभाषा माध्यम म्हणून स्वीकारावी लागली. राज्यकारभाराशी संबंधित कामात उर्दूचा वापर करावा लागला. पण हा जुलुमाचा रामराम होता. आमच्या कौटुंबिक आणि बऱ्याचशा सामाजिक जीवनातील मराठी आम्ही टिकवून ठेवली होती. आमच्या व्यक्तिजीवनातले सगळेच मराठी हद्दपार करणे निजामाला शक्य झाले नव्हते. आमच्या धार्मिक आचारांच्या, सांस्कृतिक आचारांच्या सामुदायिक अभिव्यक्तीवर काही बंधने आली होती; त्यामुळे वातावरण कोंदटले मात्र होते.

राजकीय आणि सांस्कृतिक पारतंत्र्यातून आम्हाला मुक्त करणारे जे स्वातंत्र्य आम्हाला हवे होते ते १९४८ साली मिळाले. त्याला आता ५५-५६ वर्षे झाली. आम्ही आमच्या स्वातंत्र्याचा कसा उपयोग केला? आमच्या संस्कृतीच्या आणि भाषेच्या अभिवृद्धीसाठी या स्वातंत्र्याचा उपयोग आम्ही कसा केला? बंधमुक्त झालेल्या आमच्या मनाने 'माझी मराठी मराठाच मी ही' असे फक्त समारंभ प्रसंगीच म्हटले की मराठीला आपल्या भावजीवनात आणि आपल्या सर्व व्यवहारात सन्मानाचे स्थान दिले?

## संस्कृती आणि भाषा जोडीने वाढतात

भाषा आणि संस्कृती जुळ्या बहिणीसारख्या बरोबर बरोबर वाढतात. समाजाचे धार्मिक आचार आणि विधी, उपासनेच्या पद्धती, सामाजिक रीतीरिवाज, व्यक्तीव्यक्तींचे परस्पर संबंध नियमित करणारे नियम, वागणुकीचे संकेत, अभिव्यक्तीच्या पद्धती, निवास, पोषाक, आहार इत्यादींच्या परंपरा या सर्वांचा संस्कृतीत समावेश होतो. त्याचबरोबर समाजाच्या वैचारिक संचिताचाही संस्कृतीत अंतर्भाव होतो. संस्कृतीच्या अंगाने भाषा वाढते. आपल्या व्यक्तिजीवनात, कुटुंबजीवनात आणि समाजजीवनात आपण काही परंपरा निर्माण करतो. विशिष्ट आचार आणि विधी यांच्या मागे आपण श्रद्धेचे पाठबळ उभे करतो. आपण वागणुकीचे काही संकेत निर्माण करतो. आपल्याला जे व्यक्त करावयाचे आहे त्याला प्रतिभेचे सामर्थ्य लाभले तर कलांची निर्मिती होते. जे एकाच व्यक्तीच्या मनात राहिले असते किंवा जास्तीत जास्त तिच्या आचारातून फार थोड्या लोकांना कळू शकले असते ते शब्दांच्या माध्यमातून व्यक्त झाले म्हणजे येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी जपले जाते. आपल्या संस्कृतीची वाटचाल बहुतेक वेळा भाषेतच व्यक्त होते. संस्कृती शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होते. क्वचित कधी कधी तिला रंग-रेषांचा आधार घ्यावासा वाटतो व ती चित्र किंवा शिल्प अशा माध्यमातून व्यक्त होते. संस्कृतीचे सातत्य माध्यमामुळेच राहते. आपले आचार- विचार, आपले संकेत पुढच्या पिढ्यांच्या स्वाधीन आपण भाषेमुळेच करू शकतो.

## विचारप्रक्रियेतून भाषेची वृद्धी

समाजाच्या वैचारिक संचिताचाही संस्कृतीत अंतर्भाव होतो. पृथ्वीच्या उत्पत्तीचा, जगाच्या स्थितिगतीचा, जगाचे नियंत्रण करणाऱ्या शक्तीच्या अस्तित्वाचा, माणसामाणसातील संबंधांचा, नात्यांचा, भौतिक पदार्थांच्या गुणधर्मांचा आणि आपणच निर्माण केलेल्या सामाजिक संस्थांच्या उपयुक्ततेचा विचार आम्ही केला त्यातून शास्त्रे जन्माला आली. हे सर्व व्यक्त करण्यासाठी व विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी आपण भाषा तयार केली. जेव्हा समाजात नवे विचार मांडले जातात, नव्या संकल्पनांना जन्म दिला जातो, नव्या संस्थांची उभारणी करण्याचा प्रयत्न होतो, नव्या मूल्यांचा पुरस्कार होतो तेव्हा ते सारे व्यक्त करण्यासाठी भाषेलाही आपल्यात बदल करावे लागतात. नवी परिभाषा

निर्माण करावी लागते. नवे शब्द तयार करावे लागतात. समाजाचा वैचारिक व्यवहार जेवढा समृद्ध असेल तेवढी त्या समाजाच्या भाषेतही भर पडत जाते. या प्रक्रियेने मराठी भाषाही काही वेळा पुष्ट झाली आहे. एकोणिसाव्या शतकात मराठी विचारवंतांनी आपल्या सामाजिक दोषांची चिकित्सा केली, वाईट रुढीवर हल्ले चढविले, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक समतेसारखी मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला आणि स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. हे सर्व करताना त्यांनी मराठी भाषेचाच वापर केला. त्यातले काही तर समाजाचा आदरविषय असलेले लोकनेते होते. साहजिकच त्यांचे शब्द वाचकांनी गांभीर्याने वाचले, त्याचे मनन केले. त्यांची भाषा आणि शब्द एवढेच नव्हे तर शैलीचाही लाभ मराठीला झाला. ज्या चळवळी वाढल्या, ज्या विचारांना लोकांचे पाठबळ मिळाले त्या लेखनाचा मराठीवर अधिक ठसा उमटला. शास्त्रीय विषयावर लेखन करणारांनी भाषांतरातल्या अडचणीवर मात करीत नवनवे शब्द प्रचारात आणले. एकोणीसाव्या शतकात आपल्या गद्याने जी वाटचाल केली ती लक्षणीय होती.

ज्या काळाचा उल्लेख मी केला त्या काळातील राजकीय व सामाजिक नेतृत्वाची भूमिका समाजशिक्षकाची होती. त्यांच्या लेखनाला विचारांची बैठक होती. काही मूल्यांचा आग्रह होता. त्यांची तळमळ वाचकांपर्यंत पोहोचत होती. समाजाच्या परिवर्तनाचे एक हत्यार म्हणून त्यांनी भाषेचा वापर केला. लेखकाची भूमिका समाजशिक्षकाची असते तेव्हा नेता आणि अनुयायी, लेखक आणि वाचक यांच्यात एक संवाद निर्माण होतो. असाच संवाद त्या विचारांचा प्रतिवाद करणारे आणि पुरस्कार करणारे यांच्यातही होतो. संघर्ष असतील, विरोध असेल पण तरीही संवाद असतो. असा वैचारिक संवाद सांस्कृतिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असतो. १९ व्या शतकात अनेक प्रश्नांबाबत कडाक्याचे मतभेद आपल्या नेत्यांत झाले. विचारांच्या या धुमश्चक्रीने शिक्षित महाराष्ट्राचे मन ढवळून निघाले. या सगळ्या वैचारिक आंदोलनाचा मराठी भाषेच्या वाढीला मोठाच फायदा झाला.

वाईट सामाजिक प्रथांच्या, सामाजिक उच्चनीचतेच्या कल्पनांच्या दास्यातून आपण बरेचसे मुक्त झालो. व्यक्तीच्या आणि देशाच्या स्वातंत्र्याचे मूल्य ही आपण स्वीकारले. विचारांचे आदानप्रदान करण्याची पुष्कळ नवनवी साधने उपलब्ध झाली. शिक्षणाचा मोठा प्रसार झाला. वैचारिक प्रक्रियेत भाग घेण्याची

संधी समाजाच्या सर्व घटकांना उपलब्ध झाली. आपल्या तात्कालिक स्वार्थापेक्षा सर्व समाजाच्या भवितव्याचा विचार करता येण्याची शक्यता निर्माण झाली. आपले वैचारिक विश्व पूर्वीच्या तुलनेत किती समृद्ध झाले? फारसे उत्साहवर्धक चित्र दिसत नाही. दूरवरच्या भवितव्याचा विचार करणारे द्रष्टे महापुरुष नेहमी निर्माण होत नाहीत हे खरे. परंतु प्रत्येक काळ हा समाजासमोर नवी आव्हाने आणि नवे प्रश्न निर्माण करत असतो. त्यासाठी समाजाच्या मार्गदर्शकांनी नव्याने विचार करावा लागतो आणि इतरांचे विचारही मोकळ्या मनाने ऐकून, समजून घ्यावे लागतात. समाजात असा संवाद चालू राहावा लागतो. संवादात सहभागी होणाऱ्या सर्व घटकांना एकमेकांविषयी किमान विश्वास वाटावा लागतो तरच संवाद वाढतो. समाजात विविध कारणांनी वाढलेल्या कटुतेमुळे, एकमेकांविषयीच्या अविश्वासामुळे आणि पूर्वग्रहामुळे व्यक्तिव्यक्तीत, समाजाच्या घटकाघटकांत फारसा संवादच होत असलेला आज दिसत नाही. हे वातावरण समाजाच्या प्रगतीसाठी तर हानिकारक आहेच. परंतु ते भाषेच्या, संस्कृतीच्या आणि साहित्याच्या अभिवृद्धीसाठीसुद्धा अनिष्ट आहे.

शिक्षणाच्या प्रसारामुळे उच्च शिक्षण देणारे आणि घेणारे यांची संख्या आज अनेक पटीने वाढलेली आहे. अनेक शास्त्रे अभ्यासक्रमाचा भाग म्हणून शिकली - शिकविली जात आहेत. शिक्षणाच्या या प्रक्रियेतून समाजाविषयीची आस्था वाढावी व त्याच्या भवितव्याचा विचार अधिक मोठ्या संख्येने एकत्रपणे करावा ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही. महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाविषयाबरोबरच समाजाच्या स्थितीबद्दलही मार्गदर्शन करावयाचे आहे असे आमचे शिक्षणविश्व नेहमीच मानत नाही. अभ्यासक विचारवंतांच्या लेखनाबद्दलही आशादायक वातावरण नाही. वाङ्मय, सामाजिक शास्त्रे आणि विज्ञान यांच्यासंबंधी फारशी नियतकालिके प्रसिद्धच होत नाहीत. जी तग धरून आहेत, त्यांनाही फारसे वाचक लाभलेले नाहीत. शिक्षकांची, आणि शिक्षितांचीही संख्या मोठ्या प्रमाणात वाढली; परंतु ज्ञानशाखांच्या नियतकालिकांना वर्गणीदारच काय परंतु पुरेसे चांगले लेखनही मिळत नाही. विचारांचे विश्व जेवढे गरीब असेल तेवढेच दारिद्र्य आमच्या भाषेलाही येणार. आमच्या संकल्पना आणि त्यासाठीची परिभाषा हे दोन्ही फार तर पुस्तकात राहतील. लोकांच्या वापरात त्या कशा येणार? ज्या भाषक समुदायाची संस्कृती वर्धिष्णु असते, ज्या समाजाचे विचारविश्व समृद्ध असते, जो समाज प्रगतिशील असतो

त्या समाजाची भाषा सतत प्रगती करीत असते. त्या भाषेत नवनवे शब्द येतात. ज्या समाजाची संस्कृती विविध रंगांनी फुललेली असते त्या समाजाची भाषाही सतत टवटवीत असते. जे आचार आपण टाकून देतो त्या आचारांना व्यक्त करणाऱ्या शब्दांची भाषेला गरज उरत नाही. भाषेतून ते शब्द आपोआप वगळले जातात आणि भाषा तेवढ्या हद्दीपर्यंत रोडावते.

**भावजीवनातील मराठी**

संस्कृती आणि भाषा यांचे हे अभिन्न नाते लक्षात घेऊनच आपण महाराष्ट्राच्या संस्कृतीला मराठी संस्कृती असे म्हणतो. स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणात मराठी संस्कृतीला बहर येईल अशी आपली अपेक्षा होती. या अर्धशतकाने ही अपेक्षा कितपत पूर्ण केली? पारतंत्र्याच्या काळातही आमच्या भावजीवनातले जे मराठी आम्ही टिकविले होते ते तरी आज कायम राहिले आहे काय?

माझ्या सासूबाई अंबाजोगाईच्या. योगेश्वरीच्या देवळात पहाटे काकड आरतीला जायच्या. काकड आरतीची अनेक गाणी त्यांना पाठ होती. आमच्या घरी आल्या असतानाही पहाटे जाग आली म्हणजे त्या ती गाणी गुणगुणायच्या.

*'उठी उठी बा राधारमणा, उषःकाल झाला*
*दीनानाथ हा क्षितिजावरती डोलत बघ आला*
*नीज कशी तुज आज लागली बाळा गोपाळा*
*तोंडावरचा काढुनी शेला, पाही दास अपुला*
*दूध पिणारा बाळकृष्ण का नाही अजुनी उठला?'*

किंवा

*'हरी थेंब घे रे दुधाचा*
*चांदण्याचा रंग याचा*
*गोड ना रे दुधाचा'*

आपल्याकडे त्यागराज उत्सवासारखे सामुदायिक गायनाचे उत्सव नाहीत. परंतु काही मठात, देवळात उत्सवाच्या वेळी संतकवीची पदे गाण्याची पद्धत होती. गुरुवार मंडळांची एक मोठी परंपरा मराठवाड्यात होती. दर गुरुवारी ३०- ४० लोक त्यांच्यातल्याच एखाद्याच्या घरी जमायचे. अगोदर दत्ताच्या आळवणीची पाच पदे म्हटली जायची. त्यानंतर दत्ताची आरती. आरती झाल्यावर शास्त्रीय, उपशास्त्रीय अगर इतर गाणी म्हटली जात शुक्रवारी संस्थानात साप्ताहिक सुटी असल्यामुळे गुरुवारी थोडे अधिक जागरण झाले

तरी चालत असे. पंचपदीतील पदे त्या त्या भागातल्या कोणा कवीने लिहिलेली असत व ती लोकांना पाठ होती. आता हे सर्व फार कमी झाले आहे.

काकड आरतीसारख्या शेजारत्याही म्हटल्या जात. मंगळागौरीच्या पूजेच्या वेळी गाणी म्हटली जात. श्रावणात घराघरात कहाण्या वाचल्या जात. कहाण्या गद्यात असल्या तरी ते गद्य लयबद्ध असे. छोट्या छोट्या वाक्यांनी सांगितली जाणारी कहाणी त्यातल्या गोष्टीप्रमाणेच भाषेचाही संस्कार करी. सोमवारच्या, शुक्रवारच्या, नागपंचमीच्या कहाण्या लोकप्रिय होत्या. 'कसला वसा वसता? तो मला सांगा. तुला रे वसा कशाला हवा? उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील! उतत नाही, मातत नाही, घेतला वसा टाकीत नाही' असं नाट्यपूर्ण निवेदन करणाऱ्या कहाण्या वाचणाऱ्या - ऐकणारांच्या मनावर भाषेचा ठसकाही ठसवीत होत्या. घराघरात वाचले जाणारे ते एक प्रकारचे लोकसाहित्यच होते.

ज्याला आपण संस्कृती या परिचित शब्दाने ओळखतो तो आपल्या जाणीवांचा समूह आपल्या भाषेशी एकरूप झालेला असतो. लग्नकार्यात गायिली जाणारी मंगलाष्टके, गणपती किंवा देवीची आरती, जात्यावर म्हटल्या जाणाऱ्या परंपरागत ओव्या या सर्वांच्यामध्ये निखळ काव्यगुणांच्यापेक्षा बरेच काही अधिक असते. धार्मिक श्रद्धा किंवा त्या विशिष्ट विधीबद्दलची परंपरेने आलेली श्रद्धा आपण बाजूला सारू. त्याहीपेक्षा वेगळे काही भाषिक संस्कार त्यात असतात आणि ते सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे असतात. जात्यावरच्या ओव्या आम्ही हिंदीत म्हटल्या अगर आरतीचे - मंगलाष्टकाचे इंग्रजी भाषांतर करून गायिले तर शब्दांचा गोळाबेरीज अर्थ तोच असेल पण त्याचा सांस्कृतिक अर्थ पूर्णपणे विरून गेलेला असेल. आपल्या भाषेतून, परंपरेने एखादी गोष्ट दीर्घ काळ व्यक्त होत आली तर त्यातून जाणवणारी भावना सामर्थ्यशाली असते. एखाद्या वैद्याने उगाळून गुटीचे सामर्थ्य वाढवावे तसेच त्या भावनेचे झालेले असते.

आपल्या संस्कृतीचा हा भाग आज हळूहळू अस्ताला जात आहे. काकड आरत्या, मंगळागौरीची गाणी, हादग्याची गाणी, भुलाबाईची गाणी आणि कहाण्या हळूहळू कमी ऐकू येत आहेत. हे मला सांगितले पाहिजे की, धर्मश्रद्धा किंवा या आचारपरंपरेवरील श्रद्धा कमी होत आहे याचे मला अजिबात दुःख नाही. तो माझ्या जिव्हाळ्याचा विषयही नाही. या आचारांच्या

पालनाच्या निमित्ताने मराठी भाषेचे जे आवर्तन होत होते ते कमी होत आहे याचे मला दु:ख आहे. संस्कृतीचे हे भाषिक आविष्कार आपण टाकून दिले. परंतु त्यांची जागा घेणारे इतर भाषिक आविष्कार निर्माण झाले नाहीत. आपल्या सांस्कृतिक जीवनातील मराठीच्या स्थान त्यामुळे काहीसे उणे झाले. पिठाच्या गिरण्या आल्यानंतर जाती गेली आणि जात्यावरच्या ओव्याही कमी झाल्या. होणारच. आपल्या जीवनशैलीत झालेला, होत असलेला बदल अपरिहार्य होता. खंत एवढीच या प्रक्रियेत आपल्या जीवनातले काही मराठी आपण हरवून टाकले. संस्कृतीचे हे आविष्कार आपण टाकून देत असताना नवे आचार, नव्या पद्धती निर्माण झाल्या नाहीत. समाजात जेव्हा परिवर्तन होते तेव्हा समाजाच्या श्रद्धा आणि आचार यांच्यातही परिवर्तन होते; ते स्वाभाविकच नव्हे तर आवश्यकही आहे. संस्कृती आपली कात टाकते आणि नव्या आचार- विचारांना स्वीकारते. ही प्रक्रिया होत असताना, नव्या गोष्टी समाजमनात जागा मिळवत असताना त्यांनाही पुन्हा लोकभाषेचा आधार मिळू शकतो. असे आपल्याकडे कितपत घडते आहे?

संस्कृतीचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे मनोरंजनाच्या पद्धती. लावणी आणि तमाशा, कीर्तन, मराठी नाटक आणि मराठी चित्रपट या करमणूक प्रकारानी आपल्या भावजीवनातही महत्त्वाचे स्थान मिळविले होते. समाजाच्या वेगवेगळ्या वर्गात कमी अधिक प्रमाणात मनोरंजनाचे हे प्रकार लोकप्रिय होते. या सर्व प्रकारात भाषेला, तिच्या अविष्काराला महत्त्व असल्यामुळे भाषा आपल्या संस्कृतीच्या याही क्षेत्रात महत्त्वाचा भाग होती. अलीकडील काळात मनोरंजनाच्या या मराठीं प्रकारांचे समाजमनातील स्थान कमी कमी होत चालले आहे आणि त्याची जागा इतर रंजनप्रकारांनी, विशेषत: हिंदी चित्रपटांनी, दूरचित्रवाणीवरील हिंदी मालिकांनी घेतली आहे. मराठी नाटकातील गाणी आणि मराठी भावगीते यांना आमच्या भावजीवनात एका काळात जे स्थान होते तेही आता राहिलेले नाही. या सर्व माध्यमातून आमच्या मनावर होणारा मराठीचा संस्कारही कमी झाला आहे.

मित्र हो, आपल्या भाषिक संस्कृतीचा मी विस्ताराने आपल्यासमोर उल्लेख केला तो यासाठी की ज्या साहित्याची चर्चा करण्यासाठी आपण येथे जमलो आहोत ते साहित्य या संस्कृतीचे एक घटक आहे. एवढेच नव्हे तर ते संस्कृतीचे निदर्शकही आहे. आपल्या सांस्कृतिक जीवनात पोकळी निर्माण

झाली अगर आपले सांस्कृतिक जीवन निकृष्ट झाले अगर आपण आपल्या सांस्कृतिक गरजासाठी मराठीचा त्याग करून हिंदीसारख्या इतर भाषांचा स्वीकार केला तर आपली सांस्कृतिक हानी होईल हे उघड आहे. भाषा ही तिच्याविषयीच्या उद्घोषाने वाढत नसते. ती तिच्या वापराने वाढते. आपल्या शहरातले मराठी हटत चालले, आपल्या करमणुकीतील मराठी हटत चालले, आपल्या संस्कृतीतले मराठी विरत चालले ही परिस्थिती आपल्या सर्वांना चिंतित करणारी आहे. मराठीच्या भवितव्याविषयी इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाड्यांपासून विष्णु भिकाजी कोलत्यांपर्यंत अनेक विचारवंतांनी चिंता व्यक्त केली. काही खरी खोटी आशादायक वाटणारी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करून आपण त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न बाजूला टाकले. पण वस्तुस्थितीकडे डोळेझाक केल्याने प्रश्न सुटत नसतात. आत्मवंचना फार काळ उपयोगी पडत नसते.

## साहित्यातले प्रादेशिक

साहित्य आणि संस्कृती यांच्या संबंधाचा थोडासा विचार आपण केला. अ.भा. मराठी साहित्य संमेलनाप्रमाणेच आपल्या या प्रादेशिक साहित्य संमेलनातही मराठी भाषा, संस्कृती आणि वाङ्मय यांची आपण चर्चा करतो, त्यांच्या भवितव्याची चिंता करतो, त्यांच्या अभिवृद्धीचे उपाय शोधण्याचा प्रयत्न करतो. बहुतेक वेळा आपल्या विचाराचा, चिंतनाचा विषय मराठवाड्याच्या सीमांनी मर्यादित झालेला नसतो. सगळ्याच मराठी प्रदेशातील वाङ्मयाचा विचार आपण करतो आणि ते स्वाभाविक आहे. वाङ्मयाचे मूल्यमापन करताना ते जेथे निर्माण झाले तो प्रदेश, त्यात वर्णिलेला इतिहास- भूगोल, ते लिहिणाऱ्या लेखकाची जात किंवा धर्म अशा गोष्टींना महत्त्व असत नाही. वाङ्मयाचा विभागशः विचार करताना, अभ्यासासाठी त्यांचे वर्ग पाडत असताना आपण त्या लेखनाचे बाह्य वेगळेपण विचारात घेतो. काही वेळा अभ्यासाच्या सोयीसाठी आपण वेगवेगळ्या प्रदेशाचे वाङ्मय, काही वेगळ्या जाणीवा प्रगट करणारे, समाजजीवनाच्या एखाद्या विशिष्ट अंगासंबंधीचे वाङ्मय असे भाग पाडून त्यांचा वेगळा विचार करतो. अर्थात असे विभाग कल्पिले तरी निखळ वाङ्मयीन मूल्यांच्या आधारानेच या सर्व लेखनाचे आपण मूल्यमापन करतो.

मराठवाड्यातील लेखनाचा विशेष विचार आपण प्रारंभीच्या अनेक

संमेलनात केला तो तसा करणे आवश्यकही होते. काही ऐतिहासिक अपघातांनी आपल्याला बाकीच्या मराठी प्रदेशापासून तोडलेले होते. राज्यकर्त्यांच्या धार्मिक हट्टाग्रहाने आणि असहिष्णुतेने आपल्याला मराठीत शिकता आले नाही, फारसे लिहिता आले नाही, संस्थानात लिहिलेले प्रसिद्ध करता आले नाही आणि आपल्या वाङ्मयाची चर्चा करण्यासाठी सुलभपणे एकत्र जमतासुद्धा आले नाही. या सर्व परिस्थितीवर मात करीत आपल्या लेखकांनी लिहिले आणि कार्यकर्त्यांनी वाङ्मयविषयक चळवळीही चालवल्या. या असामान्य परिस्थितीचा वेगळा विचार होणे अगत्याचे होते.

एखादी भाषा बोलणाऱ्या मोठ्या प्रदेशाच्या संस्कृतीत, एकूण चालीरीतीत, साहित्यातही बरेचसे समान असते. परंतु त्यातल्या काही भागाला लाभलेला वेगळा इतिहास, वेगळा भूगोल, त्याचे त्या विभागाच्या समाजजीवनावर झालेले परिणाम यामुळे मनुष्याच्या उपजीविकेपासून ते त्याच्या सांस्कृतिक जडणघडणीपर्यंत अनेक बाबतीत तीच भाषा बोलणाऱ्या इतर भागापेक्षा थोडेसे वेगळेपण त्या प्रदेशात निर्माण होते. ज्या लेखनाचा जन्म अशा प्रादेशिक वेगळेपणातून झालेला असतो ते वाङ्मय प्रादेशिक वाङ्मय आहे असे आपण म्हणतो. श्री.ना. पेंडसेंच्या काही कांदबऱ्यांना आपण प्रादेशिक हे विशेषण लावतो. त्या विशिष्ट प्रदेशातील लेखकांनी लिहिलेले सर्वच लेखन प्रादेशिक असत नाही. केवळ पार्श्वभूमी म्हणून त्या प्रदेशातील गावांची नावे, इतिहास आणि भूगोलाचे संदर्भ वापरले असतील म्हणूनही अशा लेखनाला प्रादेशिक म्हणता येणार नाही. लेखकाने सांगितलेली कथावस्तु, त्यातली पात्रे, त्यांचे स्वभाव, त्यांचे जीवन, त्या लेखनातील नाट्य हे सारे अपरिहार्यपणे त्या प्रदेशाच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यातून जन्मलेले असेल तरच त्या लेखनाला आपण प्रादेशिक म्हणतो. बी. रघुनाथांच्या कथा आणि कांदबऱ्यांपैकी बहुसंख्य लेखन असे प्रादेशिक लेखन आहे. निजामाच्या राजवटीमध्ये बहुसंख्याक लोकांच्या वाट्याला आलेले दुय्यम नागरिकाचे आयुष्य, त्यांच्या मनाला ग्रासणारी असुरक्षितता, त्यांच्या धार्मिक आणि सामाजिक हालचालींवर असलेले निर्बंध, संस्थानातले संरजामदारी जीवन, सर्व क्षेत्रातले मागासलेपण, कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले इतर लोक, उद्योगधंद्यांचा आणि दळणवळणाच्या साधनांचा संपूर्ण अभाव, वेगरहित संथ जीवन आणि त्यातूनच लोकांच्या आणि व्यवस्थेच्या अंगात भिनलेला आळस या सर्वांतून

बी. रघुनाथांची पात्रे आणि त्यांच्या कथावस्तु जन्माला आल्या आहेत. नागझरीचे पाटील, बेगम सकिना आणि मुबारक, माळझिपरीचा इरसाल पटवारी आबाराव, क्रौर्याची शिकवण देणारा जंगबहाद्दर एवढेच काय पण 'जनता लिंबेटाकळी'मधील सगळीच जनता मराठवाड्याची प्रादेशिकता अंगावर लेऊनच जन्माला आली आहे. आपल्याला 'फिरस्ता' या नावाने माहीत असलेल्या वा.दा. गाडगिळांनी आपल्या 'खुशखुशीत मेवा' या पुस्तकात 'जदीद गणपती व कदीम गणपती', 'आमच्या गावातील मोटार सर्व्हिस' अशा अनेक ललित लेखात या संस्थानी समाजजीवनाचे अतिशय भेदक चित्र रंगवले आहे. त्यांचे हे लेखन प्रादेशिक साहित्य म्हणूनही महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने निजामी राजवटीचा हा कालखंड आणि त्या काळातील समाज जीवन यांचे जेवढे प्रतिबिंब मराठीत ललित लेखनात उमटावयास हवे होते तेवढे ते उमटलेले नाही. स्वातंत्र्यानंतर फारच थोड्या लेखकांच्या प्रतिभेला त्या कालखंडाने साद घातली. याचा परिणाम असा झाला की हा कालखंड मराठवाड्याबाहेरच्या मराठी वाचकांना आणि येथल्याही नव्या पिढ्यांना बराचसा अज्ञात राहिला. एखाद्या समाजाच्या किंवा प्रदेशाचा इतिहास सांगणे हे वाङ्मयाचे प्रयोजन नाही हे मलाही माहीत आहे. परंतु जीवनाच्या विविध रूपांचे दर्शन वाङ्मयात घडते, वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीत घडलेल्या माणसांच्या जीवनात भिन्न भिन्न प्रकारचे तणाव, संघर्ष घडतात, माणसाच्या मनाच्या उन्नत किंवा अवनत अवस्थांची वेगळीच रूपे पाहायला मिळतात आणि या साऱ्यातून वाङ्मय समृद्ध होते. जीवनाचे हे वेगळे स्वरूप त्या भाषेच्या प्रदेशातील एखाद्या लेखकाच्या प्रतिभेला खुणावते व ते वाङ्मयात अवतरते. श्री.ना. पेंडसे आणि बी. रघुनाथ यांनी लेखन केले नसते तर मराठी वाङ्मयाची हानी झाली असती, यात शंका नाही.

बी. रघुनाथांच्या लेखनातील कथावस्तू ही त्यांची समकालीन आहे. तो काळ कुचंबणा आणि संघर्ष, तणाव यांनी भरलेला होताच. लेखकांनी केवळ समकालीन वास्तवाबद्दलच लिहावे असे नाही. निजामी राजवटीच्या या काळाबद्दल नंतर फारसे लिहिले गेले नाही. मराठवाड्याच्या प्रादेशिक जीवनात त्यापूर्वीही अगदी सातवाहनांच्या, राष्ट्रकूटांच्या, यादवांच्या काळापासून विविध आघाताना तोंड देत अनेक परिवर्तने झाली. या इतिहासाने आमच्या लेखकांच्या प्रतिभेला फारसे मोहविलेले नाही. स्वातंत्र्याचा लढा तर अजूनही अनेकांच्या मनात

ताजा आहे. आपली अनिर्बंध सत्ता टिकावी म्हणून धर्माच्या नावावर लोकांना चिथावणी देऊन क्रौर्याचे थैमान कसे माजवता येते हे आपण पाहिले. छोटी छोटी अगदी सामान्य माणसे शौर्याने नि:शस्त्र प्रतिकाराला उभी राहिली. अगदी असह्य झाले तेव्हा काहीनी शस्त्रेही हाती घेतली. स्वातंत्र्य आले आणि सत्तेच्या राजकारणाने नव्या मूल्यव्यवस्थेचा स्वीकार केला. काही सन्माननीय अपवाद वगळले तर आमच्या इतिहासातील हा महत्त्वाचा कालखंड आमच्या ललित लेखकांच्या प्रतिभेला का आकर्षित करू शकला नाही? स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आमच्या समाजजीवनात अनेक परिवर्तने आली. कुळकायद्याने अनेकांची जीवने पार पालटून टाकली. सुवर्णनियंत्रणासारख्या दुसऱ्या एखाद्या कायद्यामुळे परंपरागत व्यवसाय सोडून देऊन अनेक परागंदा झाले. खेड्यातून अनेक लोक शहरात आले. अनेक वाडे ओस पडले. कोसळणाऱ्या जुन्या व्यवस्थेच्या ढिगाऱ्यात अनेकांची जीवने दबून गेली. खेडीही बदलली. शिक्षणामुळे नव्या आकांक्षाचा आणि स्वप्नांचा जन्म झाला. सामाजिक निर्बंधाचे साखळदंड तोडून अनेक समाजघटक स्वतंत्र झाले. काही चांगल्या ललितकृतींनी या पिचणाऱ्या तरीही झगडणाऱ्या माणसांची व्यथा आपल्याला सांगितली. परंतु कितीतरी माणसांच्या परिस्थिती बरोबरच्या अनेक लढाया अज्ञातच राहिल्या. थोडे लेखन झाले पण ते पुरेसे नाही. आमच्या ललित लेखकानी काय लिहिले पाहिजे हे त्यांना सांगण्याचा माझा उद्देश नाही. प्रतिभावंताच्या स्वातंत्र्याचे महत्त्व मला मनोमन मान्य आहे. ललितकृतींच्या निर्मिती संदर्भात मराठवाड्याच्या प्रादेशिक वास्तवाच्या सामर्थ्य- शक्यतांची मी फक्त नम्रतेने आठवण करून देत आहे.

चरित्रे आणि आत्मचरित्रे हा जसा इतिहासाचा भाग होतो तसाच तो साहित्याचाही होतो. मराठवाड्यात याही बाबतीत दुर्भिक्षच आहे. भगवंत गोविंद तोडेवाल्यासारख्या एखाद्या वाङ्मय सेवकाने, आळंदच्या कल्याणराव देशपांड्यासारख्या एखाद्या स्वाभिमानी जमीनदाराने थोडासा आत्मचरित्रपर मजकूर लिहून ठेवला; पण हे सारे अपवाद. संस्थानाच्या सार्वजनिक जीवनाचा पाया घालणारे वामन नाईक आणि न्या. केशवराव कोरटकर यांचीही विस्तृत चरित्रे उपलब्ध नाहीत. लिहून ठेवणेच अवघड होते. छापणे, प्रसिद्ध करणे तर त्याहूनही अवघड होते. त्यामुळे त्या काळात समकालीनाची काही जुजबी चरित्रे सोडली तर असे लेखनच झाले नाही हे कळू शकते. पुढच्या काळातसुद्धा

परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. ज्यांच्या प्रेरक वक्तृत्वाने शेकडो तरुणांना स्वातंत्र्याच्या लढ्यात ओढले, ज्यांनी आपल्या चळवळीला समतेच्या विचारांचे अधिष्ठान दिले, असे अनेक नेते आपल्याला लाभले. स्वातंत्र्यपूर्व काळात घेतलेला कर्तव्याचा वसा ज्यांनी स्वातंत्र्यातही चालू ठेवला असे व्रती शिक्षक आपल्याकडे झाले. ज्यांनी मराठवाडाभर संगीताचे शिक्षणच दिले असे नाही तर संगीताची अभिरुची निर्माण केली, ज्यांनी विविध प्रकाराची दुर्मिळ वाद्ये जमा केली आणि पदरमोड करून संगीतमहोत्सव साजरे केले, असे संगीतोपासकही झाले. कोणी शेतकऱ्यांच्या संघटना बांधल्या, त्यांची दु:खे वेशीवर टांगण्यासाठी राजकारण केले, कोणी कामगारांच्या संघटना बांधल्या, आपल्या विचारांचा पक्ष बांधला. कोणी दलितांच्या जागृतीचे लोण आपल्याही विभागात पोहोचविले. कोणी आपल्या विचारांचा आग्रह एखाद्या आन्हिकाप्रमाणे रोज सत्याग्रह करून शेवटच्या श्वासापर्यंत व्यक्त केला. कोणी मूल्यांचा आग्रह धरण्यासाठी संसार असूनही अक्षरश: फकिरीवृत्ती पत्करली. कोणी शेतीत विविध प्रयोग केले आणि महाराष्ट्रासमोर शेतकऱ्याचा एक आदर्श निर्माण केला. अशीं विविध क्षेत्रांत कर्तबगार माणसे आपल्याकडेही निर्माण झाली आणि अनेकांच्या वाट्याला आलेल्या सामान्य आयुष्याला नियतीने असे वळण दिले की त्यातून जिद्दीचा, परिश्रमाचा, तत्त्वनिष्ठ संघर्षाचा एक वस्तुपाठ नव्या पिढ्यांना मिळाला. यापैकी फारच थोड्यांची चरित्रे लिहिली गेली.

आत्मचरित्रांची तर आपल्याकडे परंपराच नाही. कारणे अनेक असतील. व्यक्तिमात्राच्या अस्तित्वाला फारसे महत्त्वच नाही, असे आपल्या अध्यात्माच्या एका धारेने सांगितले. त्यामुळे व्यक्तिभावनांचे प्रगटन करणारी कविता न लिहिता ईश्वरस्तुतीपर कविता आपण लिहिली. तेच कदाचित आत्मचरित्र लेखनाला आडवे आले असेल. विनय आणि लीनता यांचा अतिरेकही असू शकेल. आणखी इतरही कारणे असतील. माझ्या वडलांना मी, 'तुमच्या आठवणी लिहा' असे सांगितले तेव्हा त्यांनी अनेक दिवस त्याला नकार दिला होता. 'मी फार मोठा माणूस नाही याची मला जाणीव आहे, माझ्या आठवणी, माझे आत्मचरित्र कशाला?' असे ते म्हणत. 'आणखी पन्नास वर्षांनंतर तुमचे नाव आणि जीवनातील व्यक्तिसंदर्भ यांना काही महत्त्व उरणार नाही हे मलाही कळते. परंतु जो काळ तुम्ही जगला तो तुमच्या आठवणीतून लोकांना कळेल आणि त्याचे मूल्य दीर्घकाळ टिकेल', असे उत्तर मी त्यांना देई. चरित्र आणि

आत्मचरित्र यांचा उद्देश इतिहास लेखन हा नसला तरीही इतिहासाचे, विशेषत: सामाजिक इतिहासाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. विशेषत: जेथे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घडामोडींच्या समकालीन नोंदीच नसतात किंवा असल्या तर फारच अपुऱ्या असतात तेथे चरित्रे आणि आत्मचरित्रे त्या इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन बनते. ही चरित्रे किंवा आत्मचरित्रे आपल्याकडे अधिक प्रमाणात लिहिली गेली असती तर मराठवाड्याचा एक शतकाचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास नव्या पिढ्यांना उपलब्ध होण्याला मदत झाली असती.

आज आपले, आपल्या पूर्वजांचे, आपल्या आदरणीय नेत्याचे किंवा एखाद्या दिवंगत स्नेह्याचे चरित्र लिहावे अशी अनेकांना प्रेरणा होते. अशी काही पुस्तके प्रकाशितही होत आहेत हे स्वागतार्ह आहे. परंतु अशा लेखनाचा भर घटनांची नोंद करणे व व्यक्तीचे महत्त्व विशेषणांच्याद्वारे छापील अक्षरात नोंदवून ठेवणे एवढाच असला तर तशा चरित्र किंवा आत्मचरित्रातून फारसे काही मिळत नाही. व्यक्तीचे चारित्र्य आणि तिचा स्वभाव, तिचा जीवनक्रम हे जसे चरित्राचे तसेच आत्मचरित्राचे महत्त्वाचे भाग असतात, तसाच त्याला घडविणाऱ्या आणि त्याने जिच्याशी संघर्ष केला ती परिस्थिती हाही एक महत्त्वाचा भाग असतो. या भागाचे चित्रण फारसे आपल्याकडील लेखनात येत नाही. संक्षेपाने थोडासा स्तुतीपर मजकूर लिहून जुजबी चरित्रे लिहिल्याने तो काळ उभा राहत नाही आणि पर्यायाने चरित्रनायकही उभा राहत नाही. हा त्या चरित्रनायकावरसुद्धा अन्याय असतो. काही अपवादात्मक आत्मचरित्रात मराठवाड्याचे तत्कालीन जीवन डोकावते. असे लेखन आणखी होणे अगत्याचे आहे.

झपाट्याने होणाऱ्या नागरीकरणाचा एक परिणाम म्हणजे संस्कृतीचे आपोआप होणारे सपाटीकरण. एखाद्या जमिनीतले निसर्गाने निर्माण केलेले उंचसखल भाग नागरी उपयोगासाठी सपाट केले जावे तसे छोट्या छोट्या प्रदेशांचे सांस्कृतिक वेगळेपण आजच्या समान होत चाललेल्या नागरी पद्धतीने नाहीसे होत चालले आहे. नांदेडचे आणि नाशिकचे, सोलापूरचे आणि अमरावतीचे, सांगोल्याचे आणि अष्टीचे जीवन जर सारखेच असेल तर प्रादेशिक असे काही वेगळे फारसे राहणार नाही. आणखी पन्नास वर्षांनंतर वाङ्मयाचा विचार करताना आपण प्रादेशिक वाङ्मयाचा विचारही कदाचित सोडून देऊ. परंतु

जोपर्यंत व्यक्तींची जडणघडण, त्यांच्या अनुभव पद्धती, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची भाषा एवढेच काय पण जीवनमूल्यातील त्यांची प्राधान्ये, त्या त्या प्रदेशातील काही वेगळेपणातून जन्म घेतात तोपर्यंत आणि त्या संदर्भात आपल्याला प्रादेशिकतेचा विचार करावाच लागतो.

ओघानेच आलेला एक मुद्दा सांगितला पाहिजे. महाराष्ट्राच्या विविध भागांत अनेक बोली प्रचलित आहेत, तशा त्या मराठवाड्यातही आहेत. नागरी भागात बोलल्या जाणाऱ्या बोली प्रमाण भाषेला अधिक जवळच्या आणि ग्रामीण भागात मागासवर्गात बोलल्या जात असलेल्या बोली थोड्या अधिक दूरच्या हे होणे स्वाभाविक आहे. परंतु सर्व बोली अभ्यासकासाठी सारख्याच महत्त्वाच्या असतात. समाजाच्या विविध वर्गांनी जसे लिहिते झाले पाहिजे तसेच विविध बोलींचा अभ्यासही झाला पाहिजे, बोलींचा शास्त्रशुद्ध अभ्यास हा भाषेच्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग असतो. आदिवासी विभागात काम करत असताना सेतूमाधवराव पगडींनी आदिवासींच्या बोलीभाषेविषयी लिहिले. डॉ. ना.गो. नांदापूरकरांनी बऱ्याच वर्षांपूर्वी मराठवाड्याच्या बोलीभाषेबद्दल 'प्रतिष्ठान'मध्ये एक लेखमाला लिहिली. त्यानंतर हा अभ्यास थंडावलेलाच आहे. प्र.ई. सोनकांबळ्यांसारख्या काही लेखकांनी मराठवाड्यातील महाराऊ बोलीत आपले आत्मकथन लिहिले आणि मराठीतील एका महत्त्वाच्या बोलीची आपल्याला त्यानिमित्ताने ओळख झाली. मराठवाड्यातील सर्व बोलीभाषांचा शास्त्रशुद्ध अभ्यास हा आपला प्रादेशिक वारसा जपण्याचाच एक कार्यक्रम आहे.

## दुर्लक्षित होणारा आपला वारसा

मराठवाड्यातील संतपरंपरा आणि येथे निर्माण झालेल्या मध्ययुगीन साहित्याबद्दल मी आपल्याला पुन: आठवण करून देण्याची गरज नाही. इतिहास आणि वाङ्मय दोन्ही जतन करून ठेवण्याची परंपरा आपल्याकडे फारशी नव्हतीच. जे काही सांप्रदायिक परंपरेत जतन झाले त्यापैकी काहीचे संपादन आणि प्रकाशन होऊ शकले. त्यातही काही अडचणी आल्या. एक तर आपल्या जवळच्या कागदपत्रांचे महत्त्व अनेकांना कळलेच नाही. तर काही संशोधकांनी अभ्यासाच्या निमित्ताने नेले ते परतच केले नाही. दुसराही एक प्रकार घडला. मराठवाड्यातल्या काही मध्ययुगीन लेखकांना कधी प्रादेशिक

दुराभिमानाने तर कधी उत्साहाच्या भरात काढलेल्या चुकीच्या निष्कर्षाने अभ्यासकांनी दुसरीकडे जन्म घ्यावयास लावला. मुकुंदराज, भास्करभट्ट बोरीकर एवढेच काय तर अगदी नामदेवसुद्धा या ओढाताणीतून सुटले नाहीत. विश्वनाथ अंबादास कानोल्यासारखा एखादा अभ्यासक मदतीला धावला म्हणून बरे झाले.

मी इतिहास संशोधक किंवा मध्ययुगीन साहित्याचा विशेष अभ्यासक नाही. पण तरी मलाही जाणवते ते असे की मराठवाड्यातल्या या वारशाचा यथायोग्य परामर्श आम्ही घेतलेला नाही. काही पोथ्या प्रसिद्ध झाल्या; परंतु त्याचे भाषिक आणि सांस्कृतिक संदर्भ अजूनही जोडावयाचे राहिलेले आहेत. गीतार्थबोधचंद्रिकेचे आणि गीतार्णवाच्या एका अध्यायाचे संपादन केले गेले पण बाकीचा भाग तसाच राहिला. समर्थांच्या दासबोधावरही ज्याचा प्रभाव जाणवतो तो दासोपंतांचा 'ग्रंथराज' शंकर श्रीकृष्ण देवांनी संपादून प्रसिद्ध केला त्याला आता नव्वद वर्षे झाली व ती मुद्रित प्रतही आता दुर्मिळ झाली. भाषिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या अनेक दुर्मिळ पुस्तकांचे पुन:प्रकाशन करण्याची गरज आहे. आमच्या विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदानमंडळ व शासनाच्या साह्याने असे प्रकल्प हाती घेतले पाहिजेत. मराठवाड्यातल्या अनेक जुन्या कवीनी काही पदेही लिहिली. दासोपंत, उद्धव चिद्घन, जनीजनार्दन, मध्वमुनिश्वर आणि मराठवाड्यात स्थायिक झालेले अमृतराय अशांची पदे गायिली गेली. संत कवींच्या मठातून किंवा त्यांनी स्थापिलेल्या देवघरातून त्यांची पदे उत्सवप्रसंगी आजही गायिली जातात. या पदातून सामान्यत: ईश्वरस्तुती असली तरी काहीवेळा त्यांना भावगीताचे रूप प्राप्त होते. त्यातले आत्मप्रगटीकरणही महत्त्वाचे आहे. मराठवाड्यातील अशा परंपरेने गायिल्या जाणाऱ्या पदरचनांचा वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास होण्याची गरज आहे.

आज जुन्या मराठी साहित्याचा अभ्यास कमी होत आहे. शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमातून हे लेखन शक्यतो वगळावे असा काहींचा कल होत आहे. संस्कृतीच्या परंपरेत काही वेळा हीण निर्माण होते. साहित्यातसुद्धा ते आपल्याला दिसते. कोणत्याही परंपरेत हीण निर्माण झाले की ते नाकारावे लागते. समाजाच्या, संस्कृतीच्या प्रवाहाला वाहते करून शुद्ध करावे लागते. एखाद्या गोष्टीचा अभ्यास करणे म्हणजे ते स्वीकारणे अगर त्याची भलावण

करणे नव्हे. जे नाकारावयाचे आहे तेसुद्धा अभ्यासावे लागते. चुका समजून घ्याव्या लागतात. आज स्वीकारलेल्या मानवी तसेच वाङ्मयीन मूल्यांच्या आधारे डोळसपणे जुन्याची फेरतपासणी करावी लागते. परंतु अभ्यासातून सगळे मध्ययुगीन वाङ्मय वगळणे हा सोपा पण चुकीचा मार्ग झाला. आपण जर ज्ञानेश्वर- भास्करभट्ट, नामदेव आणि तुकाराम, वामन पंडित आणि मोरोपंत, होनाजी आणि राम जोशी यांना आपल्या अभ्यासातून वगळले तर भाषेचे विभ्रम आणि सामर्थ्य, तिचा झालेला विकास आणि आमच्या वाङ्मयाची परंपरा आपल्या नीट लक्षात येणार नाही.

आपल्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचा आपण सार्थ अभिमान बाळगतो. परंतु या वारशाशी संबंधित ऐतिहासिक स्थळाचे जतन करण्याकडे आपले फारसे लक्ष नाही. अनेक ऐतिहासिक स्मृतिस्थळावर दररोज अतिक्रमणे चालू आहेत. बऱ्याच गोष्टी आपल्या दुर्लक्षामुळे अदृश्य होत आहेत. यातील काही स्थळे आपल्या वाङ्मयीन परंपराशीही संबंधित आहेत. इतिहासाचा फार मोठा कालखंड अद्याप आपल्याला पूर्णतः ज्ञात व्हावयाचा आहे. सातवाहनांची, राष्ट्रकुटांची आणि काही भागांत वाकाटकांचीही येथे सत्ता होती. त्या काळाविषयी आणि त्या काळातल्या अजून शिल्लक असलेल्या खुणाविषयी पुष्कळ संशोधिले-लिहिले जावयाचे आहे. इतिहासाचा नेहमीच वाङ्मयाशी संबंध नसतो पण एखाद्या प्रदेशाची जडणघडण, तेथल्या माणसांची मनोभूमिका समजण्याला इतर काही शास्त्रांप्रमाणेच इतिहासाचीही मदत होते. आपल्याकडे तर मध्ययुगीन वाङ्मयाभ्यास इतिहासाच्या अभ्यासाच्या जोडीनेच करावा लागतो. मराठवाड्यातील अनेक ऐतिहासिक स्थळे पाहत असताना तेथे इतिहास जसा घडला तसेच आमच्या वाङ्मयानेही काही नवी रूपे प्रगट केली याचे स्मरण होते आणि आपले मस्तक आणखी विनम्र होते.

## बहुजनांच्या विकासासाठी मराठी समृद्ध व्हावयास हवी

संस्कृती ही केव्हाही समाजातल्या एखाद्या छोट्या घटकाची नसते. संस्कृतीला जर बळ मिळावयाचे असेल तर ती समाजाच्या सर्व वर्गांची मिळून बनलेली असावी लागते. तिचे सर्व समावेशकत्व हाच तिचा प्राण असतो. एखादी भाषा समाजातले सर्व घटक बोलू लागले, वापरू लागले, आपल्या व्यवसायासाठीही वापरू लागले, त्यातून आपल्या भावनांचा अविष्कार करू लागले म्हणजे ती

समृद्ध होते. साहित्यसुद्धा याच प्रक्रियेने श्रीमंत होते. मराठीत सर्व समाजघटकांनी लिहावे म्हणजे मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध होईल हे आपल्याला अनेक मार्गदर्शकांनी सांगितले आहे. भाषेची आणि साहित्याची चळवळ सामान्य माणसांपर्यंत नेणे हाच त्यांच्या समृद्धीचा मार्ग आहे. हैदराबादच्या मुक्ततेनंतर प्रथमच परभणीला मराठवाडा साहित्य संमेलन भरले. १९५१ साली झालेल्या या चौथ्या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात आपल्या स्वातंत्र्यलढ्याचे एक स्फूर्तिदाते आणि तत्त्वचिंतक बाबासाहेब परांजपे यांनी अध्यक्षपदावरून भाषण करताना स्वातंत्र्यानंतर आपल्या वाङ्मय चळवळीने कोणते ध्येय समोर ठेवले पाहिजे याची स्पष्ट जाणीव आपल्याला करून दिली होती.

> 'भाषा हे जीवनाच्या अभिव्यक्तीचे प्रथम साधन; जीवनाच्या विविध क्षेत्रातून होणारा विकास भाषेद्वारे आविष्कृत होतो. हा विचार करताना थोड्या सुशिक्षितांचा विचार न करता मराठवाड्यातील ५० लाख जनतेचा विचार करणे आवश्यक असून आजच्या परिस्थितीत सर्व जनतेच्या जीवन- विकासाची वाट मोकळी करून देण्याचा मार्ग आपण शोधला पाहिजे. ..... लोकांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात अधिक रस घ्यावा, ज्ञानाची कक्षा वाढत गेल्यामुळे सामाजिक जीवनाबद्दलची आस्था अधिक वाढावी, समाजात, देशात, देशाबाहेर घडणाऱ्या घटना यांना माझ्या दृष्टीने सुद्धा अर्थ आहे व म्हणून त्यांचे मी पूर्ण ज्ञान करून घेतले पाहिजे. ते ज्ञान आता मला मराठीतून निश्चित मिळेल, असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करणे हे आपले ध्येय आहे.

आपला भाषेच्या संदर्भातील विचार मराठवाड्याच्या सर्व जनतेच्या भविष्याचा विचार करणारा हवा, भाषेच्या विकासातून आमच्या बहुजनांच्या विकासाची वाट मोकळी व्हावी असा तो विचार हवा हे बाबासाहेब परांजप्यांनी आपल्याला बजावले. आपल्या भाषिक व वाङ्मयीन प्रगतीची स्वातंत्र्योत्तर काळात कोणती दिशा असावी याचे दिग्दर्शन त्यांनी केले.

आपल्या मातृभाषेतून शक्य ते सर्व व्यवहार करण्यासाठी, तसा आग्रह धरण्यासाठी आत्मविश्वासाची गरज असते. माझ्या भाषेत मला जे व्यक्त करावयाचे आहे ते सर्व सांगता येईल. माझ्या भाषेत तेवढी शक्ती आहे अशी खात्री असणे ही या आत्मविश्वासाची एक बाजू. माझ्या मातृभाषेत बोलण्याने माझी

प्रतिष्ठा कमी होत नाही. उलट तिचा वापर करण्यातच माझा सन्मान आहे असे मनोमन वाटणे ही या आत्मविश्वासाची दुसरी बाजू आहे. मराठीत सर्व प्रकारचे नवनवे ज्ञान व्यक्त करता येण्यासाठी तिला सतत भर पडणाऱ्या शब्द भांडाराने समृद्ध करणे हा असा आत्मविश्वास बळकट करण्यासाठीचा पहिला उपाय. इंग्रजी, हिंदी किंवा मातृभाषेतर दुसऱ्या एखाद्या भाषेत बोलले तर आपला सन्मान वाढतो हा मराठी माणसांच्या मनातला न्यूनगंड दूर करणे हा दुसरा उपाय. या दोन्ही गोष्टी आपण कशा करतो यावर बाबासाहेबांना अपेक्षिलेला आत्मविश्वास सर्व मराठी भाषिकात निर्माण होणे अवलंबून आहे. मराठीत सामाजिक आणि भौतिकशास्त्रे, तसेच विज्ञान आणि सर्व आधुनिक तंत्रज्ञान अशा सर्व ज्ञानशाखातील ज्ञान उपलब्ध व्हावयाचे असेल, मराठी ज्ञानभाषा व्हावयाची असेल तर या ज्ञानशाखांशी कोणत्याही नात्याने संबंध येणाऱ्या सर्वांनी जाणीवपूर्वक तसा प्रयत्न केला पाहिजे. मराठी ही ज्ञानभाषा होऊच शकणार नाही अशी आपण स्वत:ची पक्की समजूत करून घेतली असेल तर दुसरे काय होणार? न्यूनगंडाने पछाडलेल्या माणसांच्या भाषेची प्रगती होऊ शकत नसते.

## सर्व समाजघटकांनी लिहिते झाले पाहिजे

आपल्या भाषिक आणि वाङ्मयीन जीवनात गेल्या अर्धशतकात खूप बदल झाले. त्यातले काही फार महत्त्वाचे आहेत. आपल्या समाजजीवनातल्या सर्व स्तरातील, सर्व क्षेत्रातील लोकांनी लिहावे, आपल्या अनुभवानी मराठी वाङ्मय समृद्ध करावे, मराठी शब्द भांडारात भर टाकावी अशी साहजिकच अपेक्षा होती. आमच्या मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य गुरुवर्य म.भि. चिटणीस यांनी आवर्जून एक उपक्रम केला होता. महाविद्यालयात विविध जाती-जमातींचे विद्यार्थी शिकत होते. त्यात अगदी छोट्या छोट्या मागास जातींची काही मुले होती. कुणी वैदू होते, कोणी वडार होते, कोणी वासुदेव होते, कोणी गोसावी होते, कोणी भिल्ल होते, कोणी लमाण होते. चिटणीसांनी या मुलांना बोलावून घेतले आणि आपल्या आठवणी लिहावयास सांगितले. त्यापैकी काही मुलांच्या आठवणी महाविद्यालयाच्या वार्षिकात प्रसिद्ध झाल्या. जे समाजजीवन आजवर मुके होते ते चिटणीसांच्या प्रयत्नाने बोलके झाले. मराठी संस्कृतीचा एक आम्हाला अनोळखी असलेला भाग त्या वार्षिकाच्या

निमित्ताने परिचयाचा झाला. नंतरच्या काळात अनेक दलित आत्मकथने मराठवाड्यात लिहिली गेली, छोट्या छोट्या मागास जातीतल्या व्यक्तींनीही आपली आत्मकथने लिहिली आणि या सर्वांनी मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासात आणि पर्यायाने वाङ्मयातही भर टाकली. मराठवाड्यात नव्याने झालेले हे लेखन महत्त्वाचे आहे यात तर शंकाच नाही. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आठवणी तर त्रोटक असणारच. परंतु प्रौढ लेखकांनी केलेल्या आत्मकथनाचीही काही पुस्तके फार त्रोटक आहेत. हे कथन अधिक विस्ताराने लिहिले जावयास हवे.

### नागरीकरण व मध्यमवर्गाचे विस्तारीकरण

स्वातंत्र्यानंतर झालेला एक महत्त्वाचा सामाजिक बदल म्हणजे महाराष्ट्राच्या इतर भागाप्रमाणेच मराठवाड्यातही झालेले नागरीकरण. शहरांची लोकसंख्या वाढली, अनेक मोठी खेडी शहराचे रूप धारण करू लागली. गेल्या पंधरा-वीस वर्षांत ग्रामीण भागात राहणारांची संख्या कमी होत गेली. शहरात आलेल्या नव्या लोकसंख्येने नागरी संस्कृतीशी आपले नाते जुळवून घेतले. मध्यमवर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्गात अनेक जातीधर्माचे लोक नव्याने सामील झाले. त्यांनी पोषाक, घरे, दळणवळण, खाण्यापिण्याच्या सवयी, बोलण्याची भाषा आणि रंजनाच्या आवडी याबाबत शहरी रिवाजांचे अनुकरण केले व ते स्वीकारले. नोकरी, व्यवसाय किंवा राजकारण करणारे लोक शहरात आलेच, त्याशिवाय शेती करणारे लोकही शहरात राहून अधूनमधून खेड्यात आपल्या शेतावर जाऊ येऊ लागले. मुलांची शिक्षणे, वैद्यकीय सोयी अशा अनेक गोष्टींसाठी शहरात राहणे आवश्यक झाले. शिवाय नव्या पिढीला खेड्यात करमणेही अवघड झाले.

शहरात किंवा मोठ्या गावात राहणाऱ्या मध्यमवर्गासाठी साहित्य हे सुसंस्कृतपणाचे एक मूल्य होते. कारकून किंवा शिक्षक यासारख्या त्यावेळी कमी पगाराच्या असलेल्या सरकारी नोकऱ्या, अपवाद वगळता बेताचीच चालणारी वकिली अगर वैद्यकी, कुणाकुणाला असलेले सरकत्याने (कुळाने) वर्षाकाठी आणून दिलेल्या पाच- दहा पोते शेतीमालाचे उत्पन्न अशी सर्वसाधारण मध्यमवर्गाची आर्थिक स्थिती होती. मराठवाड्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य जनतेच्या दारिद्र्याच्या तुलनेत ही स्थिती बरीच म्हणावी लागेल.

तरीही या वर्गाने आपल्याभोवती श्रेष्ठत्वाचे एक काल्पनिक आवरण निर्माण करून घेतले होते. शिक्षण आणि साहित्यादी कला हे श्रेष्ठतेचे मापदंड आहेत, असे त्यांच्यापैकी अनेकांना वाटे. महाराष्ट्राच्या इतर भागाप्रमाणेच येथल्या मध्यमवर्गानेही कला आणि साहित्य यांच्याबद्दल आस्था बाळगली होती.

सर्वच मध्यमवर्गीय घरात वाङ्मय, कला यांची उपासना होती अगर त्यांना आश्रय होता असे नव्हे. एखाद्या व्रती माणसाबद्दल इतरांना आदर वाटतो कारण भक्ती हे मूल्य म्हणून सर्वांना मान्य असते तशी खूप शिकलेला, एखाद्या कलेत निपुण असलेला, लेखन करणारा यांच्याबद्दल आदराची भावना होती. ज्या घरात एखादे वृत्तपत्र येई, ज्या घरात पुस्तके असत आणि वाचली जात, ज्या घरात बाजाची पेटी असे, मुली गाणी शिकत अगर कशिदा काढत ते घर सुसंस्कृत समजण्याचा प्रघात होता. आर्थिक स्थिती फारशी चांगली नसतानाही वाङ्मयादि कलाबद्दलची आस्था हा वर्ग पदरमोड करून जपत होता.

**सामाजिक जीवनात मूल्यांची उलथापालथ**

हे सारे चित्र आता बदलू पहात आहे. स्वातंत्र्योत्तर मराठी समाजाच्या फेररचनेत मूल्यप्राधान्यांचीही फेररचना झालेली आहे. दारिद्र्यात राहावे लागले तरी आपली सांस्कृतिक गुणवत्ता समाजात आपल्याला आदर मिळवून देईल हा विश्वास मध्यमवर्गाला राहिलेला नाही. सत्ता आणि पैसा हीच मोठेपणाची समाजमान्य झालेली मोजमापे मध्यमवर्गानेही स्वीकारली. ज्यांना सत्ता मिळणे अशक्य आहे त्यांनी आपले लक्ष शिक्षण व नोकरीसाठी अमेरिकेत मुले पाठविण्याच्या सुंदर स्वप्नाकडे वळविले. कारणे वेगवेगळी होती. परंतु मध्यमवर्गाच्या फार मोठ्या भागाच्या जीवनप्राधान्यात मराठी वाङ्मयाला स्थान उरले नाही. समाधानाची गोष्ट अशी आहे की शहरात राहणाऱ्या सगळ्याच मराठी माणसांच्या मनात आपण वाङ्मयाकडे पुरेसे लक्ष देत नाही, फारसे वाचत नाही, याची बोच मात्र कायम आहे. तो साहित्यासाठी जीव टाकत नसला तरी त्याचा थोडाफार जीव त्यात अडकून आहे. त्यांच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीला ही जी बोच आहे त्याचे रूपांतर कृतिशील प्रेमात कसे होईल हा खरा प्रश्न आहे.

शिक्षण हे फक्त आर्थिक सुरक्षितता मिळवून देण्याचे साधन आहे असे

मानले जाऊन त्याची संस्कृतीशी फारकत करून घेण्यात आली. परिणामतः शिक्षणाचे प्रमाण वाढले तरी वाङ्मयाचे वाचक त्या प्रमाणात वाढलेले नाहीत. वाङ्मय हे माझ्या जीवनाला उन्नत करणारे आहे, जीवनाच्या अपरिचित रूपाचे दर्शन घडवणारे आहे या श्रद्धेने ते वाचणारांची संख्या फार वाढलेली नाही. वाङ्मय हा संस्कृतीचा भाग म्हणून आणि संस्कृती हे जीवनाचे मूल्य म्हणून समाजाने स्वीकारले असेल तरच समाज वाङ्मयाभिमुख होऊ शकतो.

आज सुशिक्षित आणि जाणता मराठी माणूस एका हतबलतेचा अनुभव घेत आहे. समाजाच्या भ्रष्ट आणि अवनत अवस्थेचे स्वरूप त्याला दिङ्मूढ करीत आहे. आपल्या स्वार्थासाठी व्यवस्थेचे प्रत्येक यंत्र बिघडवून टाकायचे; जे दुसऱ्याचे आहे ते ओरबाडण्यासाठी, क्रूरपणे लुबाडण्यासाठी साळसूद हत्यारे हुडकावयाची व त्यांना गोंडस नावे द्यावयाची, सर्वांच्या भल्याची आरोळी ठोकून स्वतःच्या भल्याची तरतूद करावयाची, हा शिष्टसंमत मार्ग होऊ पहात आहे. समाजातले बलवान घटक असे वागू लागले की अगदी लहान माणसेही स्वार्थाचे आणि त्यासाठीच्या क्रौर्याचेही क्षुद्र प्रकार हुडकतात आणि समाजाला आणखी पोखरतात. जेथे संघर्षानंतर का होईना पण आपल्याला काय मिळवायचे आहे हे दिसते तेथे माणसाचे मन पुढे जाण्याची धडपड करते. जेथे अंधारच असतो आणि उजेडाची तिरीप येणारी खिडकीच उघडी नसते तेथे माणसे हालचाल थांबवतात, त्यांची मनेही थंडावतात. जे घडते आहे ते असेच घडणार म्हणून निमूटपणे स्वीकारण्याची त्याच्या मनाची तयारी होते. दोनच मार्ग सामान्य माणसाला उपलब्ध असतात. एक तर लाचार बनून, आपणही भ्रष्ट बनून या प्रवाहात सामील व्हावयाचे किंवा 'माझ्या मना, बन दगड' असा विंदा करंदीकरासारख्या कवीचा उपरोधिक सल्ला खराच समजून अमलात आणावयाचा.

मित्रहो, समाजाच्या या अवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी नीतिपर, बोधपर, उपदेशपर वाङ्मय लिहिले जावे, असे मी अजिबात सुचवत नाही. वाङ्मयाचे हे प्रयोजन आहे असेही माझे मत नाही. मानवी जीवनातील बऱ्यावाईटाचे निर्धारण करणारी नीतिमूल्ये आणि वाङ्मयातले बरेवाईट ठरवणारी वाङ्मयीन मूल्ये वेगवेगळी आहेत हे मला माहीत आहे. सामाजिक अवनतीचा परिणाम वाङ्मयाच्या निर्मितीवर आणि त्याच्या आस्वादावर होतो का एवढा मर्यादित मुद्दाच येथे मी आपल्यासमोर विचारार्थ मांडतो आहे. समाजाच्या

अशा अवस्थेतही एखादा लेखक या भयाण जीवनाचे चित्र एवढ्या समर्थपणे उभे करील की हे वास्तव आमचा पुनः एकदा थरकाप उडवील. मांजराच्या पावलाने येणारी एकाधिकारशाही समाजाच्या स्वातंत्र्याचा घोट कसा घेते हे एखादा जॉर्ज ऑरवेल सांगतोच. यंत्रसंस्कृतीने आपल्याला दिलेले मुंगीपण सांगणारा एखादा मर्ढेकर जन्मतोच. पण तो अपवाद. समाजजीवनाच्या अशा अवस्थेचा ललित लेखकांच्या लेखनावर काही परिणाम होत नसेल? वेगवेगळ्या व्यक्तिजीवनातील छोटे मोठे तणाव, भावनांचे संघर्ष लक्षात घ्यावेत, त्यांना वाङ्मयरूप द्यावे असे याही काळात बहुसंख्य लेखकांना वाटू शकेल? वाङ्मयात व्यक्त होणाऱ्या विविध जीवनानुभावांना सामोरे जाण्यासाठी त्यांचे ग्रहण करण्यासाठी आवश्यक मनोवस्था रसिकांची असेल काय? वाङ्मयाचे, विशेषतः ललित वाङ्मयाचे शांतपणे रसग्रहण करावे अशी त्याची मानसिक अवस्थाच नसावी.

## मराठीच्या अध्यापनाचे प्रश्न

शिक्षण घेणारांची संख्या खूप वाढली. विविध समाजघटकातील, वेगवेगळी सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी लाभलेले विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. या स्वागतार्ह गोष्टीने मराठीच्या शिक्षकासमोर काही नवी आव्हानेही उपस्थित केली आहेत. कित्येक वेळा शिकवावयाच्या वेच्यात अगर पुस्तकात आज व्यवहारात नसलेल्या आचारांचे, मावळत्या संस्कृतीचे संदर्भ येतात. कधी अशा सांस्कृतिक संदर्भातून निर्माण झालेले शब्द, वाक्प्रचार किंवा प्रतिमा येतात. एखाद्या कवितेतले, कथेतले ग्रामीण जीवनाचे काही संदर्भ शहरी माणसासाठी एकदम अनोळखी असतात. ते विद्यार्थ्यांना नीट समजून द्यावयाचे असतील तर शिक्षकाला त्यांची पार्श्वभूमी अगोदर स्वतः समजून घ्यावी लागते. शिक्षक किती बहुश्रुत आहे, इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, विज्ञान, यासारख्या शास्त्रांची, विविध कलांची त्याला ढोबळ तोंडओळख तरी आहे का? समाजजीवनाचे त्याचे निरीक्षण कसे आहे आणि महत्त्वाचे म्हणजे जे शिकवावयाचे आहे त्या लेखनात आलेले विविध संदर्भ समजून घेण्यासाठी आणि नंतर समजावून देण्यासाठी किती परिश्रम करण्याची त्याची तयारी आहे या सर्व गोष्टीवर त्याला यश मिळणे अवलंबून आहे. आज मराठी शिकवताना शिक्षकांच्यासमोर सांस्कृतिक संदर्भाविषयी आणि विद्यार्थ्यांना अपरिचित असू शकणाऱ्या वास्तवाविषयी आपले स्वतःचे ज्ञान घासूनपुसून चक्क करणे

आणि नंतर पूर्व तयारीनिशी तो वेचा सर्व संदर्भासह विद्यार्थ्यांना शिकविणे असे आव्हान उभे असते. यासाठी आमच्या विशेषत: माध्यमिक शाळांतील शिक्षकांना आपण किती मदत करतो? प्रत्येक वेच्याच्या प्रारंभी दिलेली चार-पाच ओळींची प्रस्तावना आणि कठीण शब्दांचे अर्थ एवढ्याने काम भागत नाही. विद्यार्थ्यांची - मग ते शहरातले असोत अगर खेड्यातले - त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन शिकवावे लागते. त्यासाठी शिक्षकांना अधिक सामुग्री पुरविली गेली पाहिजे. शासनाचे प्राधान्य मराठीच्या अध्यापनाला नसेल तर असे प्रयत्न फारसे होणारच नाहीत. एका संस्थेने 'वाचू आनंदे' या नावाच्या चार पुस्तकांचा संच प्रसिद्ध केलेला वाचण्यात आला. भाषेचा किंवा वाङ्मयाचा वेचा शिकवत असताना विद्यार्थ्यांना कोणते सांस्कृतिक संदर्भ उपलब्ध करून द्यावेत आणि त्यांचे भाषा शिक्षण अधिक रसदार कसे करावे याचा एक प्रयत्न या पुस्तकांनी आपल्यासमोर ठेवला आहे. असे अनेक प्रयत्न सर्व स्तरावरच्या विद्यार्थ्यांसाठी करणे आवश्यक आहे. शिकणारा विद्यार्थी लक्षात घेऊन कदाचित वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके तयार करावी लागतील. शिक्षकांनीसुद्धा आपण शब्दार्थ सांगणारे यंत्र नव्हेत तर प्रवाही भाषा आणि प्रवाही संस्कृती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणारे एक महत्त्वाचे दुवे आहोत हे आपले स्थान लक्षात घेतले पाहिजे.

**अभिरुचिसंपन्न वाचक**

आपल्या भाषेचे महत्त्व समजणारा आणि वाङ्मयाचा आस्वाद घेण्याची क्षमता असलेला विद्यार्थी निर्माण करणे ही कठीण गोष्ट आहे. परंतु रसिक-वाचकांचा वर्ग निर्माण करणे त्याहीपेक्षा कठीण आहे. शालेय अभ्यासक्रमासारखी निश्चितता आणि कालमर्यादा रसिक निर्मितीच्या प्रक्रियेला घालता येणार नाही. ती सतत चालणारी एक दीर्घकालीन प्रक्रिया असते. खाद्य पदार्थांच्या चवीतले सूक्ष्म भेद आणि त्याची कारणे कळण्यासाठी जशी जीभ तयार व्हावी लागते, गायकाचे कौशल्य आणि त्याने विशिष्ट गानप्रकाराशी आणि घराण्याशी राखलेले इमान कळण्यासाठी जसा कान तयार व्हावा लागतो तसेच साहित्याच्या वाचनासाठी आस्वादक मन तयार व्हावे लागते.

एखाद्या ज्ञानविषयासंबंधीचे लेखन तो विषय समजून घेण्यासाठी वाचणे आणि एखादी कविता, कथा, ललित लेख किंवा कादंबरी वाचणे या दोन्ही

क्रियात मूलभूत फरक असतो. ज्ञानविषयाची परिभाषा माहीत असेल तर ते वाचल्यानंतर त्यातील माहिती अगर ज्ञान वाचणाराला ज्ञात होते. ज्ञान संपादन ही एक बुद्धिगम्य क्रिया आहे. वाङ्मयाचे असे नाही. वाङ्मयाचे वाचन करताना वाचकालासुद्धा एका प्रकारच्या निर्मितिप्रक्रियेत भाग घ्यावा लागतो. घरी आलेल्या पाहुण्याचे स्वागत करण्यासाठी आपणही उठून थोडेसे दारापर्यंत जावे तसा रसिकाने लेखकाच्या अनुभवाकडे जाण्याचा प्रयत्न करावा लागतो. वाङ्मयाचा वाचक हा 'प्रतिभाजुषू' असावा लागतो असे मम्मटाने सांगून ठेवले आहे. वाचकाच्या ठिकाणी अपेक्षित असलेले हे रसिकत्व प्रत्येक माणसाच्या ठिकाणी कमी अधिक प्रमाणात उपजत असलेल्या दुसऱ्या व्यक्तीबद्दलच्या सहानुभावावर झालेल्या संस्काराने निर्माण होते. ते निर्माण करण्याचे नक्की ठोकताळे सांगता येणार नाहीत. कारण ती एक भावनिक प्रक्रिया आहे. मात्र ती फार महत्त्वाची आहे. अभिरुचिसंपन्न वाचक हा वाङ्मयव्यवहाराचा पायाच आहे. अशा वाचकांचा वर्ग जेवढा वाढेल तेवढे आमच्या वाङ्मयाला उपकारक होईल. मूल लहान असल्यापासून त्याचे एका सुसंस्कृत वाचकात रूपांतर होईपर्यंत अनेक घटकांची मदत होते. अगदी आईने म्हटलेल्या 'अडगुले मडगुले सोन्याचे कडगुले रूप्याचा वाळा तान्ह्या बाळा तीट लावू' येथपासून लयीचे आणि भाषेचे संस्कार व्हावयास प्रारंभ होतो. घरात होणाऱ्या संस्काराचा आपण विचार केलाच आहे. विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण हे ही त्याचे मन वाङ्मयाच्या रसास्वादाला योग्य करण्यासाठी महत्त्वाची कामगिरी करते. जे वाचन आपण करतो त्याचाही संस्कार आपल्या अभिरूचीवर होत जातो. प्रत्येकाची मनोरचना भिन्न भिन्न असल्यामुळे जो लेखक मला आवडेल तो दुसऱ्याला आवडेलच असे नाही. असे असले तरी काही समान आवडी निर्माण होतातच. समाजातील प्रत्येक घटकाची, प्रत्येक कुटुंबाची संस्कृती थोडीफार इतरांपासून वेगळी असते. परंतु तरीही सर्व समाज अनेक सांस्कृतिक दुव्यांनी बांधलेला असतो.

कोणी घरी जात्यावरच्या ओव्या ऐकलेल्या असतात, कोणी वडलांनी-आजाने गुणगुणलेले अभंग ऐकलेले असतात. कोणी आजीने सांगितलेल्या गोष्टी ऐकलेल्या असतात तर एखाद्या भाग्यवंताने चांगल्या शिक्षकाने मुद्दाम पाठ करून घेतलेल्या मराठी कविता स्मरणात ठेवलेल्या असतात. कोणी कीर्तने ऐकलेली असतात, कोणी तमाशा पाहिलेला असतो. कोणी गाणे

ऐकलेले म्हटलेले असते तर कोणी चित्रे काढलेली असतात. माणसाच्या जीवनातल्या अनेक नाजूक भावनांचे रंग आपल्याही मनावर अशा संस्काराने थोडेफार चढलेले असतात. दुसऱ्याबरोबर कसे वागावे, शेजाऱ्याबरोबर कसे वागावे, दुसरा कोणी दु:खी असेल, अडचणीत असेल तर आपली प्रतिक्रिया काय व्हावी हे नाही म्हटले तरी आपल्या घरात पाहून आपण शिकतोच. माणसामाणसातले विविध कारणांनी असलेले अंतर बाजूला सारून आपल्या अंत:करणापर्यंत दुसऱ्याचा अनुभव वाङ्मय घेऊन येते आणि आपली अभिरुची तो अनुभव समजून घेण्याला आपल्याला मदत करते.

शिक्षितांचा वर्ग वाढला म्हणजे वाङ्मयाच्या अभिरुचीसंपन्न वाचकांचा वर्ग आपोआप वाढतो हे खरे नाही. अगदी शहरात राहणारे, ज्यांच्या अनेक पिढ्यांना शिक्षणाचा लाभ मिळाला त्यांच्यापैकी काही मुले मराठीच काय कोणतेच वाङ्मय अजिबात वाचत नाहीत. मराठी वाङ्मय वाचणे आपल्या उन्नयनासाठी आवश्यक आहे असे त्यांना त्यांच्या पालकांनी किंवा शिक्षकांनी सांगितलेच नसावे किंवा त्यांनी ते ऐकले नसावे. तुमच्या ऐहिक उन्नतीसाठी मराठी शिकण्याची गरज नाही, वाङ्मय शिकण्याची तर बिलकूलच नाही असे जर आम्ही विद्यार्थ्यांना बालपणापासून सांगत असलो तर ते वाङ्मयाकडे कसे वळणार? उपदेशाचे हे अडथळे पार करून अनेक अभियंते, वैद्यकीय आणि संगणक तज्ज्ञ तरीही उत्तम मराठी वाचतात आणि लिहितात; पण त्याचे श्रेय आमच्या शैक्षणिक व्यवस्थेला नाही.

स्वातंत्र्य आले. मराठीवरील बंधने दूर झाली. आपल्या संस्कृतीला मोकळेपणाने श्वास घेता येऊ लागला. या अर्धशतकात मराठवाड्यातील वाङ्मयविश्वात अनेक परिवर्तने झाली. लेखकांची संख्या वाढली. मोठ्या प्रमाणावर पुस्तके प्रकाशित होऊ लागली. ग्रंथप्रकाशनाचे समारंभ ही शहरांच्या सांस्कृतिक जीवनातली नित्याची बाब झाली. समाजाच्या विविध वर्गातल्या लेखकांनी आपल्या आत्मकथनांनी समाजजीवनाच्या आजवर अपरिचित असलेल्या भागाचे दर्शन घडविले. आपल्या कवींनी आपल्या अनुभवक्षेत्राशी इमान राखत नव्या प्रतिमांना जन्म दिला. काही कादंबरीकारांनी कोसळणाऱ्या मूल्यव्यवस्थेतही आपले माणूसपण राखू पाहणाऱ्या माणसांशी आपला परिचय करून दिला. नाटक, लघुकथा, चरित्रे, ललितलेख अशा काही वाङ्मयप्रकारात आणि इतिहास, तत्त्वज्ञान व समाजविचार यासारख्या वैचारिक क्षेत्रात तुलनेने कमी

लिहिले गेले तरी आपल्या आशा पल्लवित ठेवल्या गेल्या. समीक्षेसारख्या काही क्षेत्रांत आपल्याला अभिमान वाटेल असे लेखन झाले. तरीही सर्वच वाङ्मय प्रकारात लक्षणीय असे आणखी खूप लिहिले जावयास हवे होते अशी माझी भावना आहे आणि आपणही माझ्याशी सहमत व्हाल अशी माझी खात्री आहे. भाषिक पारंतत्र्यात असताना एक प्रकाराचा न्यूनगंड असणे स्वाभाविक होते. लेखनाच्या स्वरूपाबरोबरच ललितकृतींच्या संख्येवरही त्याचा परिणाम झाला. आज असे होण्याचे काहीच कारण नाही.

परमेश्वराकडे जाणारे भक्ताचे मन निरुपाधिक असावे लागते. जीवनाकडे निरुपाधिक होऊन जो पाहू शकतो तोच लेखक होऊ शकतो. सगळे ग्रह - पूर्वग्रह, सगळे व्यक्तिगत राग -लोभ बाजूला सारावे लागतात तरच जीवनाचा थांग लागू शकतो, माणसांच्या नाते संबंधातल्या अनेक गुंतागुंतीचा शोध घेता येतो. सभ्यतेच्या आणि संस्कृतीच्या बुरख्याआड लपलेल्या हिंसेचा वेळ येताच उभा राहणारा फणा दिसू शकतो. अंधारातल्या माणसाची वेदना जाणवू शकते. अगदी छोट्या गोष्टीनेही कुणाच्या जीवनात फुललेले आनंदाचे संगीत ऐकू येऊ शकते. लेखकाला जसे निरुपाधिक व्हावे लागते तसे वाचकालासुद्धा एखादी ललितकृती वाचत असताना थोडेफार व्हावे लागते. असे निरूपाधिक कसे होता येईल हे सांगणारा मी एखादा मांत्रिक नाही. मात्र माझा तुमच्या सामर्थ्यावर विश्वास आहे, मग तुम्ही लेखक असा अगर वाचक असा. ते तुमचे अंगभूत सामर्थ्य जागृत होवो आणि मराठी सारस्वताची अधिकाधिक सेवा आपल्या सगळ्यांच्या हातून घडो, ही माझी प्रार्थना आहे.

ही प्रार्थना करण्यासाठी तुम्ही माझी निवड केली आणि या प्रार्थनेत आपणही सहभागी झाला याबद्दल मित्रहो, मी तुमचा फार फार आभारी आहे.

छायाचित्रकार : विठोबा पांचाळ

प्रकाशक : प्रभाकर साळेगावकर, चिटणीस, ५६ वे मराठवाडा साहित्य संमेलन, माजलगाव

'परमेश्वराकडे जाणारे भक्ताचे मन निरुपाधिक असावे लागते. जीवनाकडे निरुपाधिक होऊन जो पाहू शकतो तोच लेखक होऊ शकतो. सगळे ग्रह - पूर्वग्रह, सगळे व्यक्तिगत राग - लोभ बाजूला सारावे लागतात तरच जीवनाचा थांग लागू शकतो, माणसांच्या नातेसंबंधातल्या अनेक गुंतागुंतीचा शोध घेता येतो. सभ्यतेच्या आणि संस्कृतीच्या बुरख्याआड लपलेल्या हिंसेचा वेळ येताच उभा राहणारा फणा दिसू शकतो. अंधारातल्या माणसाची वेदना जाणवू शकते. अगदी छोट्या गोष्टीनेही कुणाच्या जीवनात फुललेले आनंदाचे संगीत ऐकू येऊ शकते.'